# परिशिष्ट

# परिशिष्ट

## (अ)

नांव : मोहन पाटील

जन्म : १ / ६ /१९४९ (मूळ गाव शिरदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर)

शिक्षण : एम्. ए., पी. एच्. डी. (मराठी)

व्यवसाय : अध्यापन. (निवृत्त मराठी प्राध्यापक)

(श्रीमती जी. के. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर)

पत्ता : ४५, त्रिमूर्ती कॉलनी, एम. आय. डी. सी. नजिक,

जयसिंगपूर ४१६ १०१, जि. कोल्हापूर.

दूरध्वनी : (०२३२२) २२१२५७, मो. ९८९०० ९२२७२

**प्रकाशित साहित्य :**

१) गाव आणि मातेच्या कतिवा (कविता संग्रह) श्री लेखन वाचन भांडार, पुणे : १९८१

२) कोंडमारा आणि फुलपाखरू (दोन लघुकादंबऱ्या) सुरेश एजन्सी, पुणे : १९८४

३) शापित वास्तू कल्पित गोष्टी (कथासंग्रह) लेटर्स पब्लिकेशन, सांगली : १९८६

४) राजयोग (कै. वसंतदादा पाटील, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या आत्मकथनाचे शद्बांकन) अक्षर प्रकाशन, सांगली : १९९०

५) लिगाड आणि खांदेपालट (दोन लघुकादंबऱ्या) मौज प्रकाशन, पुणे : १९९७

६) बस्तान (लघुकादंबरी) प्रतिभास प्रकाशन, परभणी : १९९७

७) लोकसाहित्य आणि संकल्पना, मानसन्मान प्रकाशन, पुणे : १९९८

८) पाचुंदा (पाच लघुकादंबऱ्यांचा संग्रह) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे : २००२

९) ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद : २००२

१०) साखरफेरा (कादंबरी) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे : २००६

११) ग्रामीण कादंबरीतील स्त्री (वैचारिक) स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद : २००९

१२) नांगर आणि इतर एकांकिका (एकांकिका संग्रह) दर्या प्रकाशन, पुणे : २०१०

**संशोधन –**

१) 'मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्रीजीवनाचे चित्रण'
या विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पीएच्.डी. (२००४)

२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थसहाय्याने 'बोलीभाषेतील म्हणी–वाक्प्रचारांचा समाजभाषा–वैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास' या विषयावर लघु प्रकल्प.

**नियुक्ती व पुरस्कार –**

१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, 'युवक भारती'
इ. ११ वी पाठ्यपुस्तकाचे संपादन १९८५ ते १९९०

२) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळावर 'मराठी वाङ्मयकोश खंड–३'
संपादक समितीवर २००४–२००७

३) 'कोंडमारा आणि फुलपाखरू' पुस्तकांस १९८६ चा म. रा. सा. सं. मंडळाचा
'यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार'.

४) 'पाचुंदा' ग्रंथास उत्कृष्ट कादंबरी वाङ्मयाचा 'शब्दांगण' पुरस्कार (मिरज) २००३

५) 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती' या ग्रंथास 'समीक्षा' वाङ्मय प्रकारातील कोपरगांवचा कै. भि. ग. रोहमारे पुरस्कार २००३

६) वरील ग्रंथास शिवाजी विद्यापीठाचा 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती' पुरस्कार २००४

*******



**श्री. मोहन पाटील**

लेखक : ‘साखरफेरा’

# मुलाखत

१) **नांव** – मोहन पाटील

२) **शिक्षण** – एम. ए., पीएच्. डी. (मराठी)

३) **व्यवसाय** – अध्यापन निवृत्त मराठी प्राध्यापक

(श्रीमती जी. के. जी. कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर)

४) **आपला छंद कोणता.** – लेखन व वाचन.

५) **वयाच्या कोणत्या वर्षापासून आपण लेखनाला प्रारंभ केला?**

महाविद्यालयीन वयात आणि त्याहीपूर्वी हायस्कूलमध्ये असताना वाचनाची सवय होती. ती कशी रूजली माहित नाही. पण पुस्तके मला आवडायची. कथा, कादंबरी, कविता वाचायला आवडायच्या त्या सुमारास म्हणजे साधारण १९७०–७१ साली सांगली कृषिउत्पन्न बाजार समितीमार्फत 'कृषीमित्र' या नावाचे एक शेतकरी शेतीविषयी मासिक प्रसिद्ध व्हायचे. मग लिहिण्यात, लिहिलेले प्रसिद्धीसाठी पाठविण्यात गोडी वाटू लागली.

६) **लेखक होण्याची म्हणजे लेखन करण्याची प्रेरणा कोठून मिळाली?**

१९७३–७४ साली विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे एम. ए. च्या वर्गासाठी प्रवेश घेतला. त्यावेळी आमच्या वर्गावर समीक्षा, काव्य असे पेपर शिकवायला प्रा. स. शि. भावेसर यायचे. ते विषय शिक्षक असले तरी त्यांना विद्यार्थ्यांविषयी खूप आपूलकी आस्था असायची. तासाव्यतिरिक्त त्यांच्याशी चर्चा व्हायची एकदा मला ते म्हणाले, ''पाटील अलिकडेच प्रसिद्ध होणारे खेड्यावरचे साहित्य तू वाचतोस ते तुला पटते काय? तू खेड्यातून शेतकरी कुटुंबातून आलेला एक विद्यार्थी आहेस. ग्रामीण जीवनावरची कथा, कादंबरी, कविता आणि तू पाहिलेले भोगलेले प्रत्यक्ष ग्रामीण जीवन यामध्ये तुला खरे खोटे असे काही अंतर वाटते काय? तुला या स्वरूपाच्या लेखनात वरवरचे काल्पनिक, रंजक म्हणून बनवून लिहिलेले असे काही दिसते काय? हे बघून तू वास्तव खरे काय नि कसे आहे हे तू लिहू शकतोस. तुला कोणी अडवणार नाही.'' भावे सरांनी केलेली ही सूचना डोकीत घर करून बसली.

कदाचित यालाच प्रेरणा वगैरे म्हणता येईल. पुढे तीच माझी लिहिण्याची गरज बनली. मला वाटू लागले नि आजही वाटते की हे अनुभव मला लिहायला हवे. ग्रामीण वास्तव वगैरे आपण शद्ब वापरतो. पण त्या वास्तवातले अनुभवसंचित दुर्लक्षित करून चालणार नाही.

७) **एक ग्रामीण कथा लेखक/कादंबरीकार म्हणून आपले 'स्थान' आहे. हे आपले स्थान आपण लेखनाने प्राप्त केले. तुम्ही केलेल्या या लेखनाला 'वास्तवाधार' आहे का? तो कसा? जरा सविस्तर सांगा?**

– योगायोगाने मला सतत शहरात रहावे लागले नाही. नोकरी गावा नजीकच मिळाल्याने गावाशी, शेतीशी संबंध तुटला नाही. तुमचे अनुभवच त्या परिसरातले असतील तर तुम्ही दुसरे काय लिहिणार? अनुभव उसने घेऊन लिहिणे एका घटनेवर तर्कट रचून लिहिणे ही लेखक म्हणून स्वतःची आणि वाचकांचीही घोर फसवणूक आहे. लिहिणारा प्रामाणिक असलाच पाहिजे कारण वाचकाला तुमच्याबद्दल फार मोठा विश्वास असतो. साहित्य म्हणून कल्पनेला जागा आहे. पणकल्पनासुद्धा वास्तवातून जन्मायला पाहिजे. कल्पनेवर कल्पना करून लिहणे धोका दिल्यासारखे आहे. पिकांविषयी, शेतीविषयी कल्पना करून भागत नाही. तिथे तुमची गाठ लख्ख वास्तवाशीच पडते.

८) **पूर्वसुरींचा प्रभाव कोणता? कसा? कोणते ग्रामीण लेखक आवडते आहेत? त्यांचे कोणते लेखन आवडते?**

– मी मराठी विषयाचा अध्यापक, अध्ययनासाठी नवी–जुनी, मराठी तसेच इतर भाषेतील अनुवाद केलेली किती एक पुस्तके स्वभाविकच मला वाचावी लागली. नुसत्या वाचनवेडापेक्षा सजग वाचन भान येऊ लागले. आवड निवड बनत गेली. आधीचे आडवे–तिडवे वाचन होतेच त्यात वेचकता आली. पण लोककथा, लोकगीतं, रूढी, परंपरा तसेच भविष्य अद्‌भूत गोष्टी काही अज्ञात गुढ गोष्टीवरचे लेखन, अध्यात्म, पुराणकथा हे सारे वाचत राहिलो. पण प्रभाव म्हंटला तर कोणा विशिष्ट पुस्तकाचा वा लेखकाचा माझ्यावर पडला नाही. ग्रामीण साहित्यातील हमीद दलवाई, व. ह. पिटके, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, अण्णाभाऊ साठे यांची पुस्तके मला आवडली.

**९) ग्रामीण साहित्यातच लेखन का केले?**

– ग्रामीण पिंड असेल तर ग्रामीण परिसरातले लिहावेसे वाटणे ही गोष्ट स्वाभाविकच आहे.

**१०) 'लेखन' आणि 'जगणे' यात अंतर असावे का?**

– नाही.

**११) 'साखरफेरा' कादंबरी लेखनापाठीमागची प्रेरणा कोणती?**

– साखरफेरा ही कादंबरी मुख्यतः साखरेचा प्रश्न, ऊसाचा दर, ऊसवाले त्याविषयीचे आंदोलन आणि त्यानिमित्ताने घडणाऱ्या सामाजिक, राजकिय आर्थिक अशा घडामोडींची कहाणी आहे. साखर–प्रश्न अद्यापी न सुटलेला प्रश्न आहे. साखर कारखानदारीतून महाराष्ट्राला नव–नवे नेते मिळाले. ऊसामुळे सत्तेच्या खूर्च्या मिळाल्या. हे एकच पीक असे आहे की बँकेत सोन्याच्या जिन्नसासारखे गहाण ठेवता येते. या पिकाचे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अक्षरशः व्यसन आहे. याला अनेक बाजू आहेत. उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यातील संघर्षाला अनेक सुक्ष्म पदर आहेत. माझ्यापरिने त्यातील अनेक गोष्टींना स्पर्श करण्याचा प्रयत्न 'साखरफेरा' मध्ये केला आहे. अजून त्याविषयी खूप आहे.

**१२) कृषिव्यवस्थेला उत्पादनाला चांगले भाव मिळावेत ही बाब समजण्यासारखी आहे, पण भूमीहिनाने जगावे कसे? सर्वांनाच जास्त भाव देऊन माल खरेदी करणे परवडेल का?**

– ऊसाला दर मिळतो तो बाजारपेठेत साखरेचे भाव वाढवूनच मिळतो. त्यामुळे सामान्य, मध्यमवर्गीय शहरी कुटुंबातील माणसाला चढ्या भावाची साखर कडू वाटू लागते. पण हेच राजकारण आहे. एकाच्या अंगावरचे पांघरून हिसकावून दुसऱ्याच्या अंगावर टाकायचे. त्यामुळे कोणी तर एक थंडीने गारठणारच. राजकीय निर्णय असेच असतात. त्याचीही सवय झाली आहे. पण दुसरीकडे आपण रंगीत दूरदर्शन संच घेतो. महागडे शॅम्पू, चप्पल, बूट घेतो. गाड्या घेतो. त्यावेळी कोणीही कुरकुरत नाही. मात्र जीवनाश्यक वस्तूंचे भाव वाढले. (आणि ते सुद्धा शेतकऱ्याने पिकवलेले जिन्नसांचे भाव) की सर्वत्र ओरड सुरू होते. आश्चर्य वाटते

४ रूपयांचा कांदा १२ रू., २० रू. किलो झाला की डोळ्यात पाणी येते. पण शीतपेय, सॉस, ज्यूस यांच्या बाटली बंद किमती आपण लेबल बघून मोजतो. तक्रार करीत नाही. हा विषय खूप विचार करण्यासारखा आहे. माझ्या एका नोकरदार मित्राचा कौटुंबिक खर्च असा आहे.

१) पगार रू. २०,०००/– मासिक वेतन

२) खाण्यापिण्याच्या वस्तूवरील खर्च रू. ४०००/–

३) चैनीच्या, गरज म्हणून हव्यास वाटणाऱ्या वस्तूवरील खर्च रू. १४,०००/–

याचे संशोधन झाले पाहिजे.

जीवनाश्यक वस्तू सर्वांना हव्यात पण प्रत्यक्ष शेती करायला नको शेतीवरची माणसे हळूहळू कमी होत आहे. मुली शेतकरी नवरा पसंत करत नाहीत. आणि शेती मालाचे भावही वाढायला नको अशी मानसिकता बनली आहे.

**१३) शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांना मानाचे स्थान देण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी तुमचे मत काय आहे.**

– शेतकऱ्याला मानाचे स्थान नको आहे. निसर्गानेच ते त्याला दिलेले आहे तो बळीराजाच आहे. पण त्याच्या कामाला योग्य दाम देऊन त्याचा स्वाभिमान जपायला नको आहे काय?

**धन्यवाद सर!**

*******



## श्री. दिवाकर श्रावण चौधरी

लेखक : ‘बुझ्र्वागमन’

# परिशिष्ट

# (ब)

नाव : श्री. दिवाकर श्रावण चौधरी

जन्म : ८/६/१९४२

व्यवसाय : शेती

सरपंच – डांभुर्णी ग्रामपंचायत, कालावधी १९७३–१९७७, १९८३–१९८७

संचालक – मधुकरराव चौधरी सह. साखर कारखाना, फैजपूर,

ता. यावल, जि. जळगाव, कालावधी १९९२–१९९७

पत्ता : मु. पो. डांभुर्णी, ता. यावल, जि. जळगाव

मोबाईल : ९४२१८१७७८८

**प्रकाशित साहित्य :**

१) 'स्किझोफ्रेनिया', प्रथम १९८७ मध्ये मॅजेस्टिक प्रकाशन द्वारा प्रकाशित

२) 'स्किझोफ्रेनिया' मराठी/हिंदी आवृत्ती प्रकाशित, पेंग्वीन इंडिया दिल्ली २००७

३) 'बुझ्र्वागमन', अनुबंध प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००७

४) 'बुझ्र्वागमन', २००९ कादंबरीवर आधारीत डिजिटल फिल्मची निर्मिती.

**हा चित्रपट मामी फेस्टिव्हल मुंबई येथे दाखविला गेला.**

*****



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## मुलाखत

१) **नाव** – श्री. दिवाकर श्रावण चौधरी

२) **व्यवसाय** – शेती

सरपंच – डांभुर्णी ग्रामपंचायत, कालावधी १९७३–१९७७, १९८३–१९८७

संचालक – मधुकरराव चौधरी सह. साखर कारखाना, फैजपूर,

ता. यावल, जि. जळगाव, कालावधी १९९२–१९९७

३) **'बुझ्र्वागमन' पूर्वी कोणत्या साहित्यप्रकारात आपण लेखन केले?**

– 'बुझ्र्वागमन' पूर्वी 'स्किझोफ्रेनिया' हे चरित्रात्मक पुस्तकाचे लेखन केले आहे. तसेच 'सरपंचाची डायरी' हे ग्रामीण अनुभव (अप्रकाशित) लिखाण केले आहे.

४) **त्या साहित्यप्रकारातील तुम्ही बरेच वाचले असेल?**

– नाही.

५) **त्याचा प्रभाव तुमच्या साहित्यावरती विशेषतः बुझ्र्वागमनवरती कसा आहे?**

– सदर लिखाण स्वानुभवातून झालेले आहे.

६) **'बुझ्र्वागमन' मध्ये एका पोळलेल्या आर्थिक संघर्षात सापडलेल्या कास्तकाराची कैफियत आलेली आहे. हे जगणं तुम्ही प्रत्यक्ष जगलात कां? ते कसे थोडे सविस्तर सांगा.**

– हो. प्रत्यक्ष जमीन कसत असतांना जे अनुभव आले ते मी मांडले आहेत. वेळोवेळी मजूरांनी केलेली कोंडी व शासनाचे शेती विषयक अयोग्य धोरण यामुळे माझी झालेली आर्थिक कुचंबणा व निसर्गाने दिलेला दगा–याचा परिपाक म्हणजे बुझ्र्वागमन होय.

७) **'बुझ्र्वागमन' मध्ये वर्णन केलेला परिसर कोणता?**

–'बुझ्र्वागमन' मध्ये यावल, रावेर तालुक्यातील लेवा–गणबोलीचा संपूर्ण परिसर वर्णन केला आहे.

८) **'जगणे' आणि 'लिहणे' यात अंतर असावे का?**

– अजिबात असू नये.

९) **'बुझ्र्वागमन' मधील बोली म्हणजे 'लेवागण बोली' होय याच बोलीचा वापर तुम्ही कां केलात? थोडे सविस्तर सांगा.**

– मी ज्या बोलीच्या परिसरात अनुभव घेतले त्याच बोलीत मांडले. ज्या मातीशी इथला शेतकरी रक्ताच्या नात्याने बांधला गेलेला आहे. त्याचा आयुष्य भराचा व्यवहार ज्या बोलीत चालतो त्याच बोलीचा वापर करणे मला गरजेचे वाटते.

१०) **'ढासळलेली कृषि व्यवस्था' हा 'बुझ्र्वागमन'चा अत्यंत कमी शद्बात आशय सांगता येईल. या व्यवस्थेच्या सुधारणेसाठी कोणते उपाय योजावेत?**

– ढासळलेली कृषि व्यवस्था सावरण्यासाठी केवळ सत्ता टिकवण्यासाठी राजकारणापुरते मर्यादित नको तर मुलभूत नि शाश्वत विकासाची धोरणे असावीत. सिंचनात वाढ झाली पाहिजे हे करताना शेती एकट्याच्या श्रमावर अवलंबून नसून ते टिमवर्क असते म्हणून मजूरी व इतर उत्पादन खर्चातील झालेली वाढ यांचा पिकांचे दर ठरवताना विचार झाला पाहिजे.

११) **ज्याच्याजवळ शेतीच नाही, केवळ नोकरी वरती जगलो असा माणूस कृषिव्यवस्थेतील उत्पन्नाला अव्वा ते सव्वा (जास्तीत जास्त) भाव दिल्यास कसा जगेल?**

– मजुरांना द्याव्या लागणाऱ्या मजुरीचे दर तसेच पगारदार नोकरांना महागाईच्या प्रमाणात भत्ते व पगार मिळतो त्यातून खायला लागणारे अन्नधान्य जे शेतीतून येते हे इतर वस्तुंच्या झालेल्या महागाईच्या तुलनेत कमीच आहे. पेट्रोल, डिझेलच्या किंमती वाढल्या आहेत, मोटारगाड्या, चैनीच्या वस्तू यांच्या किंमती वाढल्या आहेत या महागाईचे आपल्याला काही वाटत नाही. आपण फक्त अन्नधान्याचे दर अव्वाचे सव्वा झाले म्हणतो. हे नक्कीच संयुक्तीक नाही.

१२) **आणखी काही लेखनाची इच्छा? कोणत्या साहित्य प्रकारात लेखन करणार?**

– लिखाणासाठी नजरेसमोर अजून तरी विषय नाही.

**धन्यवाद सर!**

******